# महिला सबलीकरण घटनात्मक व कायदेशीर तरतुदी व ७३ वी घटनादुरूस्तीने महिलांचा सहभाग - एक अभ्यास

डॉ. व्ही. एम. पाटील ए. एस. सी. कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) जि. सांगली.

**प्रस्तावना :**

२० व्या शतकात स्त्रियांच्या स्थितीत फार मोठे परिवर्तन घडून आले. १९ व्या शतकात महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती गुलामासारखी होती. स्त्रिया रूढी आणि परंपरांच्या जोखडात अडकलेल्या होत्या. स्त्रियांची स्थिती सुधारली पाहिजे. त्या सक्षम बनल्या पाहिजेत यासाठी समाजसुधारकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शिक्षणाचा प्रसार झाला, केशवपन, बालविवाह यासारख्या प्रथा अन्यायकारक आहेत याची जाणीव झाली. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी भाग घेतला. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांनी आल्या हक्काविषयी मागणी करायला सुरूवात केली. मतदान प्रतिनिधीत्व, समान वेतन इत्यादी आधिकार स्त्रीला मिळाले. घटनेने तिच्या संरक्षणासाठी अनेक कायदे केले. भारतात १९७५ नंतर महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. ७३ व्या घटनादुरूस्तीने महिलांना स्थानिक संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण देऊन लोकशाही प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविला.

**१. महिला सबलीकरण - घटणात्मक व कायदेशीर तरतुदी :**

भारतीय संविधान हे जगातील एक आदर्श संविधान मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांना सक्षम करण्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब केला. स्वातंत्र्याचा, समतेचा अधिकार बहाल करून महिलांच्या कर्तृत्वाला नवी दिशा प्राप्त करून दिली. म. फुले, सावित्रीबाई फुले यासारख्या समाजसुधारकांनी अथक प्रयत्न करून स्त्रियांना समाजात स्थान मिळवून दिले, त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. १) समाजसुधारकांनी स्त्रियांसाठी केलेल्या प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत कायद्याव्दारे प्रतिबिंबीत झालेले दिसते. स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने आज अनेक कायदे व अनेक तरतुदी केल्या आहेत. स्वातंत्र्य, समता, न्याय या मुल्यांचा स्वीकार केला आहे. त्याव्दारे स्त्री पुरूष समानता निर्माण करण्याचे ध्येय ठेवले आहे. असे असले तरी भारतातील जात, धर्म, भाषा यासारख्या सामाजिक समस्यांमुळे महिलांची उपेक्षा झालेली दिसते. त्यासाठी योग्य कायदे व त्यांची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच समाजाचे प्रबोधन होणेसुध्दा तितकेच महत्त्वाचे आहे. आज कोणतेही राष्ट्र महिलांच्या सहभागाशिवाय आपली सर्वांगिण प्रगती करू शकत नाही. भारतीय शासनाने महिला सहभागाचे महत्त्व ओळखून व राष्ट्राच्या विकासात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी अनेक कायदे व घटनात्मक तरतुदी केल्या आहेत. शिवाय महिला विकासाचे समर्पक धोरणही निश्चित केले आहे. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि समाजव्यवस्थेत त्यांना महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यास मोठे सहाय्य केले आहे. राज्यघटनेतील निरनिराळ्या तरतुदीमुळे स्त्री-पुरूष समानता दिसून येते. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने सर्व अधिकार दिले आहेत. २) धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही व्यक्तीविरूध्द राज्य भेदभाव करणार नाही असे संघटनेने स्पष्ट केले आहे. कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान आहेत. हे स्पष्ट केल्यामुळे स्त्रीया राजकीय व सामाजिक जिवनात पुढे आल्या प्रौढ मताधिकारामुळे स्त्रियांच्या मानसिकतेत बदल झाला आपण पुरूषांच्या तुलनेत कोणत्याही बाबतीत कमी नाही कोणतेही सार्वजनिक पद आपण पुरूषांइतके समर्थपणे सांभाळू शकतो हे स्त्रियांना प्रथम जाणवले. राज्य घटनेने स्त्रियांना राजकीय व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्यातून त्यांच्या सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत झाली. असे असले तरी आज देखिल आपल्या समाजाने स्त्री-पुरूष समानतेचे तत्व मनापासून स्विकारलेले आहे असे म्हणता येणार नाही. परंतू २० व्या शतकातील स्त्रीचा विचार करता असे दिसते की आजच्या स्त्रियांच्या स्थितीत फार मोठे परिवर्तन झाले आहे. याचे बरेसचे श्रेय भारतीय घटनेला द्यावे लागते.

**१.१. भारतीय राज्य घटनेतील स्त्रियांचे हक्क :**भारतीय राज्य घटनेने स्त्रियांचे हक्क मान्य केले आहेत व त्यांना संरक्षण प्रदान करण्याच्या हेतूने काद्याची निर्मिती केली आहे.

| | |
|---|---|
| कलम १४ - | स्त्री अथवा पुरूष या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. कायद्यापुढे सर्व समान आहेत. |
| कलम १५(१)- | नुसार धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या आधारावर कोणत्याही कारणावरून राज्य नागरिकांमध्ये भेदभाव केला जाणार नाही. |
| कलम १५(३)- | नुसार कोणत्याही गोष्टीमुळे स्त्रिया, बालके यांच्याकरीता कोणतीही विशेष तरतूद करण्याचा अधिकार राहील त्याला प्रतिबंध करता येणार नाही. |
| कलम ३६(क)- | नुसार उपजिविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरूषांना सारखाच असेल. |
| कलम ३६(६)- | स्त्री व पुरूष या दोघांनाही समान कामासाठी समान वेतन मिळेल. |
| कलम ४२ - | कामाच्या ठिकाणी माणुसकीची वागणूक व प्रसुती सहाय्य. |
| कलम ५१(अ)- | महिलांच्या प्रतिष्ठेला बाधा आणण्याच्या प्रथा परंपरांचा त्याग केला जाईल. |
| कलम २४३(ड)- | पंचायतीमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातील. |
| कलम २४३ - | महापालिकांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित |

**१.२. महिला सबलीकरणासाठी कायदेशीर तरतूद :**

१. विधवा विवाह कायदा (१८५६)
२. सतीबंदी कायदा (१८२९)
३. बालविवाह प्रतिबंधक कायदा (१८२९)
४. हिंदू विवाह कायदा (१९५६)
५. व्दिभार्या प्रतिबंधक कायदा (१९५५)
६. घटस्फोटाचा कायदा (१९५५)
७. पोटगी कायदा (१९४६, १९५६)
८. वेश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा (१९५६)
९. गर्भपाताचा कायदा (१९७२)
१०. गर्भजल परिक्षा विधेयक (१९८८)
११. बलात्कारासंबंधी कायदा (१९८३)

इत्याइी कायदेकरून महिलांना कायदेशीरदृष्ट्या सदृढ करण्याचा प्रयत्न केला आहे.

**२. भारतातील महिला सबलीकरण धोरण :** सुरूवातीच्या काळात भारत सरकारने महिलांसाठी कल्याणकारी योजनांवर भर देवून धोरण निश्चित केले होते. १९७५ नंतर कल्याणकारी धोरणे जादा विकासभिमुख बनली. महिलांच्या सर्वांगिण विकासावर भर देण्यात आला. १९९० नंतर महिला सबलीकरण हे नवे धोरण भारत सरकारने स्विकारले. काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांचा महिला सबलीकरण धोरणावर भर राहिला. या धोरणांतर्गत शिक्षण, आरोग्य, कायदा, न्याय व प्रशासिकय सेवांमध्ये नोकरीचे संधी व राजकीय क्षेत्रात राखीव जागा हे महिला सबलीकरणाचे ध्येय व क्षेत्र ठरविले.

**३. ७३ व्या घटनादुरूस्तीतील महिला आरक्षणाबाबत तरतूदी :** भारतीय राज्यष्टनेच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणासंबंधी मार्गदर्शक तत्वे देण्यात आलेली आहेत. त्यापैकी राज्यघटनेच्या ४० व्या कलमात असे स्पष्टपणे म्हटले आहे की, स्थानिक पातळीवर ग्रामपंचायतीची स्थापना करून त्यांना आवश्यक ते अधिकार देण्यात यावेत, या तत्वाच्या अनुषंगाने राज्यांनी पंचायत राज्यांची स्थापना केलेली आहे. तरीही स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक दर्जा प्राप्त झाला नव्हाता. सत्तेचे विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने होण्यासाठी त्यांना घटनात्मक दर्जा प्राप्त होणे गरजेचे आहे. राज्याच्या धोरणांची मार्गदर्शक तत्वे सरकारने

अंमलात आणली पाहिजेत असे घटनात्मक बंधन नसल्याने विकेंद्रिकरण पाहिजे तवेढ्या प्रमाणात झाले नाही. बहुतेक सर्व घटकराज्यांनी पंचायत राज्यांची स्थापना केली होती. परंतु प्रत्यक्षात या स्थानिक स्वराज्य संस्थांना राजकीय व आर्थिक स्वायतत्ता अधिकार कमी प्रमणात होते. त्यांच्यावर राज्यसरकारचे अधिक नियंत्रण होते. देशातील सर्व ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था परावलंबी होत्या. त्यांना राज्यसरकाराच्या आर्थिक मदतीवर अवलंबून राहावे लागत. असे तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांना राजकीय व आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी त्यांना जादा अधिकार देणे गरजेचे झाले. लोकांचा स्थानिक स्वराज्य संस्थातील सहभाग वाढविण्यासाठी ह्या संस्थांना वैधानिक दर्जा प्राप्त करून देण्याची गरज निर्माण झाली. राज्यशासनाचा तसेच राजकीय पक्षांचा वाढता हस्तक्षेप थांबविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक स्वायत बनविणे आवश्यक झाले. १९९२ साली ७३ वी घटनादुरूस्ती करण्यात येऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक व वैधानिक दर्जा प्राप्त करून देण्यात आलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाचे अधिकार राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले असून त्यांना राजकीय व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व स्वायत बनविण्यात आले आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीचे पंचायत राज्य प्रशासन अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका, ग्रामसभा, पंचायत, जिल्हा परिषद राज्यातील त्रिस्तरीय व विकेंद्रीत रचना प्रतिनिधीत्व, आरक्षण, कार्यकाळ आर्थिक स्वायतता, वित्त आयोग कर आकारणी व वसुलीचे अधिकार, लेखापरिक्षण इत्यादी बाबत अनेक नव्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. अर्थात ह्या तरतूदींचे पालन करणे राज्यसरकारांना बंधनकारक झालेले आहे. थोडक्यात राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून देणेचे महत्त्वपूर्ण कार्य ७३ व्या घटनादुरूस्तीने केले आहे.

**३.१. ७३ ची घटना दुरूस्ती :** पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकिर्दीत सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत पंचायत राज्यसंबंधी विधेयक मांडले. त्या विधेयकास विधानसभेने २२ डिसेंबर १९९२ रोजी तर राज्यसभेने २३ डिसेंबर १९९२ रोजी मान्यता दिली. २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींनी मंजूरी दिल्यानंतर या पंचायत राज्य व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळाला. २४ एप्रिल १९९३ पासून या 'पंचायत राज' कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानाच्या २४३ व्या कलमात पंचायत राज व्यवस्थेची तरतूद करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्राचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय जीवनामध्ये व इतर सर्वच क्षेत्रात महिला समक्षीकरणाच्या प्रक्रियेत ७३ व्या घटनादुरूस्तीने मोजाची कामगिरी बजावली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील निवडक ग्रामपंचायतीतील स्त्री सदस्यांच्या विकासात ग्रामपंचायतीच्या सहभागामुळे झालेल्या परिणामाला ७३ व्या घटनादुरूस्तीने महिलांना दिलेल्या ३३ टक्के आरक्षणाचा मोलाचा वाटा आहे. आज गरीब, मागासलेल्या, भटक्या विमुक्त वर्गातील स्त्रिया राजकीय क्षितीजावर आपले कतृत्व सिध्द करताना दिसतात. त्याचे श्रेय ७३ व्या घटनादुरूस्तीचे द्यावे लागेल.

स्वातंत्र्यपूर्वकाळापासून जे आजपर्यंत महिलांच्या प्रगतीची वाटचाल व तिच्या राजकीय सहभागाचा विचार केला तर ग्रामीण राजकारणात महिलांची संख्या अत्यंत अल्प राहिली आहे. भारतातील पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले आहे. रूढी, प्रथा, परंपरा यामुळे महिलांना कमी लेखले गेले. त्यामुळेच स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांचा राजकारणात अत्यंत कमी सहभाग राहिला आहे. महात्मा गांधीनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत आणून त्यांच्यामध्ये जागृती निर्माण केली. म. फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादी समाजसुधारकांनी वेगवेगळ्या पातळीवर स्त्री उध्दाराचे कार्य केले.समाजसुधारकांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी जरी प्रयत्न केले असले तरी स्त्रियांवर परंपरेचा पगडा होता. या स्त्रिया जुन्या रूढी, प्रथा, परंपरेच्या बाहेर पडण्यास तयार नव्हत्या. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील महिलांच्या सबलीकरणासाठी केलेले प्रयत्न पाहता केंद्र शासनाने अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कायदे केले आहे. असे असले तरी भारताला उज्ज्वल बनविण्याच्या बाबतीत भविष्यकाळात स्त्रियांचा वाटा मोठा असणार आहे. कारण स्त्री ही या देशाची निम्मी शक्ती आहे. जागतिक पातळीवर झपाट्याने होणारा विकास आणि दिवसेंदिवस बदलत जाणारी परिस्थिती पाहून भारत सरकारला स्त्रीशक्तीचा वापर करून घेणे गरजेचे आहे. प्रत्येक क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. हे लक्षात आल्यानंतर सबलीकरणासाठी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न सुरू करण्यात आले. पंचवार्षिक योजनांमधून स्त्रियांसाठी अनेक तरतूदी केल्या. राजकीय क्षेत्रात राखीव जागा ठेऊन महिलांना राजकारणात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे. याचबरोबर ग्रामीण भागातील स्त्रियांच्या सबलीकरणासाठी स्वर्णजयंती, ग्रामस्वयंरोजगार योजना, स्वयंसहाय्यता बचत गट इ. योजना सुरू करून महिलांना एकसंघ करून त्यांच्या नेतृत्व विकासात वाढ करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

महाराष्ट्रात पंचायत व्यवस्था हा विकासव्यवस्थेचा कणा आहे त्यामुळे तेथे निवडून येणारे नेतृत्व अधिक प्रभावी, अधिक महत्त्वकांक्षी, अधिक सुजान असणे स्वाभाविक आहे. तसेच विकासप्रक्रिया ही राजकीय प्रक्रिया असल्याने तिचा कार्यक्रम व उद्दिष्टपूर्ती होण्यासाठी पुरूषांबरोबर स्त्रियांची ही निवड होणे आवश्यक ठरते. यासाठी स्त्रियांमध्ये राजकीय जाणीवजागृती येणे आवश्यक आहे. त्याचबरोबर महिला कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात सक्षम बनल्या तरच ही प्रक्रिया येण्यास मदत होईल. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील निवडक ग्रामपंचायती मधील महिला सदस्यांचा ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर ग्रामपंचायतीच्या कार्यामध्ये स्त्रीयांच्या सहभागाच्या परिणामांचे मुल्यांकन या विषयावर मी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर अभ्यासाठी प्रश्नावली पध्दतीचा वापर करून व महिलांच्या सक्षम भेटी गाठी घेऊन प्रश्नावली भरून घेतली आहे हा अभ्यास करताना २००७ ते २०१२ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत विजयी झालेल्या एकूण ७३ महिला सदस्या व पदाधिकारी निवडले. मुलाखती घेण्यासाठी वापरण्यात आलेल्या प्रश्नावलीचे सात भागात विभाजन केले आहे. त्यामध्ये अ) वैयक्तीक माहिती, ब) कौटुंबिक माहिती, क) व्यावसायिक माहिती, ड) ग्रामपंचायत, सदस्यांसंबंधी माहिती, इ) ग्रामपंचायत कार्यानुभवासंबंधी माहिती, ई) प्रशिक्षण अनुभवासंबंधी माहिती, फ) सामाजिक जाणीवा संबंधी माहिती. अशा सात भागामध्ये प्रश्नपत्रिकेचे विभाजन केले आहे. या प्रश्नावलीच्या अनुषंगाने ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर महिलांमध्ये झालेल्या सक्षमीकरणात आणि सक्रिय सहभागातील परिवर्तन शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :** महिलांच्या प्राथमिक जडणघडणीमध्ये तिच्या कुटूंबाचा व गावाचा मोठा वाटा असतो. महिलांचा व्यवसाय सामाजिक दर्जा, धर्म, शिक्षण यावर महिलांचे व्यक्तिमत्व घडत असते. आता अस्तित्वात असलेल्या सवैधानिक तरतूदीमुळे महिलांना प्रतिनिधीत्व मिळणे अवघड जात नाही. प्रारंभीच्या काळात महिलांची शैक्षणिक पत्रता कमी होती. ग्रामीण भागातील शिक्षणांच्या प्रसारामुळे आता हे चित्र बदलत आहे. राजकारणात श्रीमंती कुटूंबाचा प्रभाव जाणवत असला तरी स्थानिक स्वराज्य संस्थेत त्यांची मक्तेदारी राहिलेली नाही या सर्व गोष्टी सर्व्हेक्षणातून पुढीलप्रमाणे निष्कर्षित झाल्या आहेत.

१) महिलांना ७३ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे ३३ टक्के आरक्षण दिलेले असले तरी घटनात्मक तरतूदीनुसार अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जमाती, खुला अशी विभागणी केलेली आहे.

२) पंचायतराज व्यवस्थेतील कार्यरत असलेल्या महिलांचा वयोगटाचा शोध घेत असताना ३६ ते ४५ वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे म्हणजेच ४३.४१ टक्के आहे आणि १८ ते २५ वयोगटातील महिलांचे प्रमाण ९.४३ टक्के आहे यावरून तरूण महिलांचे राजकारणातील सहभागाचे प्रमाण अत्यल्प आहे.

३) कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यात ग्रामपंचायत व्यवस्थेतील कार्यरत असलेल्या महिलांची मातृभाषा १०० टक्के मराठी आहे.

४) सर्व्हेक्षणातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार बहूसंख्य सदस्य (९८.११) टक्के हे हिंदू धर्मिय आहेत.

५) करवीर तालुक्यातील पंचायतराज व्यवस्थेत निवडून आलेल्या महिला या ८ वी ते १० वी पर्यंत शिक्षण झालेल्या अधिक (३२.०७) आहेत. त्याखालोखाल ५ वी ते ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या महिला सदस्या (२६.४१) आहेत. निरक्षर महिला सदस्यांचे प्रमाण ११.३२ टक्के आहे.

६) पंचायतराज संस्थेतील महिला सदस्यांच्या कुटूंबातील स्थावर व जंगम मालमत्तेसंबंधी माहिती संकलित केली असता असे निदर्शनास आले की, ज्या सदस्यांकडे राहते घर, शेतजमिन, पशुधन जंगम मालमत्ता आहे त्या महिला सदस्या अधिक सक्षम बनलेल्या आहेत. परिणामी पंचायतराज व्यवस्थेत सदस्य म्हणून निवडून आलेल्या आहेत.

७) महिला सदस्यांचा वार्षिक कौटूंबित उत्पन्नाची आकडेवारी संकलित केली असता असा निष्कर्ष निघतो की, २५,००० ते १,००,००० हून अधिक उत्पन्न असलेल्या महिला सदस्यांची संख्या ९७ टक्के एवढी आहे. त्यामुळे असे म्हणता येईल की अधिक उत्पन्न असणाऱ्या गटातील महिला ग्रामपंचायतीमध्ये सदस्य म्हणून निवडून आलेल्या आहेत.

८) महिला कौटुंबिक निर्णयामध्ये तसेच कौटूंबिक आर्थिक निर्णयामध्ये पूर्णपणे समाधानी असतील तर त्या सक्षम आहेत असा अर्थ होतो. सदर सर्व्हेक्षणात आर्थिक आणि कौटूंबिक निर्णयाबाबत अनुक्रमे ९६ टक्के असे प्रमाण आढळून आले आहे.

९) पंचायत व्यवस्थेतील महिलांना सक्षम बनवायचे असले तर त्यांच्यामध्ये राजकीय जाणीव जागृती निर्माण करायची असेल तर कुटूंबप्रमुख आणि इतर सदस्यांचे पाठबळ असावे लागते. करवीर तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील सदस्य असलेल्या महिलांना कुटूंबप्रमुख व इतर सदस्यांचे पाठबळ मिळत असल्याचे दिसून येते.

१०) करवीर तालुक्यातील पंचायत व्यवस्थेत सदस्य असलेल्या महिला या जास्तीत जास्त प्रमाणात गृहिणी, शेती व शेती संलग्न उद्योगाशी संबंधीत आहेत. (५३ पैकी ४३ महिला)

११) करवीर तालुक्यातील ६९.८१ टक्के महिला सदस्या या पाच वर्ष कार्यतर आहेत. त्या खालोखाल दोन वेळा निवडून आलेल्या महिला सदस्यांची टक्केवारी १८.८६ टक्के आहे. म्हणजेच एकदा निवडून आलेल्या महिला सदस्यांची संख्या सर्वाधिक आहे.

१२) ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर ३३ टक्के महिला आरक्षण असले तरी बिनविरोध निवडून आलेल्या महिलांचे प्रमाण कमी म्हणजे २६.४१ टक्के इतके आहे.

१३) एकदा पंचायतराज संस्थेत निवडून आल्यानंतर तेथील कामाचा अनुभव, प्रशिक्षण मार्गदर्शन इत्यादी गोष्टीमुळे महिलांना पंचायतराज व्यवस्थेविषयी अधिक माहिती प्राप्त झाली. परिणामी बहुसंख्य महिला पुढील निवडणूक निवडण्यात स्वारस्य आहे (६४.१५) असे निदर्शनास आले.

१४) पंचायतराज व्यवस्थेतील एकूण ७३ महिला सदस्यांपैकी ६२ सदस्यांनी ग्रामपंचायत कामासाठी पुरेसा वेळ देता येतो असे सांगितले म्हणजेच सदस्य महिलांमध्ये राजकीय जाणीवजागृती अधिक प्रमाणात होऊन राजकारणाची आवड निर्माण झालेली आहे. तसेच मासिक सभांना हजर राहणाऱ्या महिलांची संख्याही जास्त प्रमाणात आहे.

१५) ग्रामपंचायतराज व्यवस्थेतील महिला सदस्य जास्तीत जास्त प्रमाणात पाणीपुरवठा (३३.९६) त्याखालोखाल रस्तेदुरूस्ती, साफसफाई व आरोग्य (३०.१८) याबाबतीत जास्त दक्ष असल्याचे निदर्शनास आले.

१६) सर्व्हेक्षणातून असे दिसून येते की, ग्रामसभेत बहुसंख्य महिला सदस्य विविध समस्याविषयक प्रश्न विचारतात म्हणजेच प्रश्न विचारण्याचे धाडस, समस्यासंबंधीचा अभ्यास यात वृध्दी झाल्याचे आढळते.

१७) पंचायतराज व्यवस्थेतील महिला सदस्यांना शासन प्रशिक्षण देते त्यामुळे पंचायतराज व्यवस्थेच्या कायदे कानुन विषयक तपशीलवार माहिती मिळते. यातून महिलांमध्ये राजकीय जाणीवीकरणात वाढ झालेली दिसून येते असे बहुसंख्य महिलांच्या बाबतीत आढळून आले.

१८) ७३ व्या घटनादुरूस्तीमुळे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण मिळाले त्यामुळे सदस्य महिलांची संख्या वाढली. सर्व्हेक्षणातून असे निदर्शानास आले की बहुसंख्य महिला सदस्य स्थानिक महिलामंडळाचे सदस्य आहेत. तसेच उत्सव मंडळ, दुध्द संस्था, सहकारी विकास संस्था, पतसंस्था इत्यादी संस्थामध्येही महिलांचा सहभाग वाढलेला आहे. म्हणजेच ग्रामपंचायतराज व्यवस्थेतील महिला सदस्यात सामाजिक जाणीवांचा विकास झलेला आहे.

१९) पंचायतराज कायदा अधिकार, जबाबदारी याबाबतीत बहुसंख्य महिला सदस्यांनी माहिती प्राप्त करून घेतली आहे. परिणामी त्या अधिक सक्षम होऊन पंचायतराज्याच्या कामकाजात सक्रीय सहभाग घेतात.

२०) १०० टक्के महिला सदस्यांनी ७३ व्या घटनादुरूस्तीचे स्वागत करून आरक्षण आवश्यक आहे असे मत नोंदविले आहे. म्हणजेच महिलांच्या सबलीकरणांसाठी व जाणीवीकरणासाठी आरक्षणाची आवश्यकता आहे.

२१) सर्व्हेक्षणातून असे लक्षात आले आहे की, ग्रामपंचायतीच्या महिलांच्या सहभागामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा दर्जात सुधारणा झाल्याचे तसेच पुरूष सदस्यांच्या वर्तणातही फरक झालेला आढळून येत आहे.

२२) महिला आरक्षणामुळे महिलांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

**शिफारशी :**

१) ग्रामीण स्तरावरील संस्थांमध्ये कार्यरत अणाऱ्या महिलांच्या समीक्षकरणासाठी त्यांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षात वाढ करण्यात यावी, प्रशिक्षण शिबीरांची संख्या वाढवावी.

२) ग्रामीण पातळीवर सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक समस्या योग्यप्रकारे मांडता याव्यात यासाठी ग्रामपंचायतीतर्फे घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभा, महिलासभा यांची संख्या वाढवावी.

३) प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकात स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना, अधिकार, कार्यपध्दती व भूमिका याचा समावेश करावा.

४) पंचायतराज स्तरावर घेतल्या जाणाऱ्या आर्थिक निर्णयात महिलांची मते विचारात घ्यावीत.

५) ग्रामीण पातळीवर कार्य करणाऱ्या महिलांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन करणारी शिबीरे घ्यावीत.

६) लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांना आरक्षण द्यावे त्यामुळे महिलांची संख्या जास्त असणाऱ्या गावात महिलांचे अधिक प्रतिनिधी निवडून येतील व राजकारभाराचे सर्व अधिकार महिलावर्गाला मिळतील.

७) महिला साक्षरतेचे प्रमाण वाढावे व त्याची साक्षरता पातळी किमान पदवीपर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजे.

८) पंचायतराज व्यवस्थेत निवडूण आलेल्या महिलांसाठी कालबध्द प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन शासनामार्फत केले पाहिजे की, जेणेकरून नेतृत्व करणाऱ्या महिलांना त्यांची जबाबदारी व कर्तव्य याची जाणीव होईल.

९) प्रत्येक कुटूंबाची जी मालमत्ता आहे या मालमत्तेतील ५० टक्के वाटा हा महिलांना द्यावा की जेणेकरून महिलांमध्ये आत्मविश्वास वाढेल परिणामी त्या सक्षम बनतील.

१०) महिलांविषयी असलेले विविध कायदे महिलांना माहिती व्हावेत यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबीरांचे आयोजन करावे. अशा शिबीरांमध्ये नामांकित कायदेतज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करावीत.

११) पुरूषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांवर निर्णय लादू नयेत. स्त्रियांना स्वतःचे निर्णय स्वतःघेता यावेत यासाठी शासनाने नियम करावेत.

१२) ज्या ज्या क्षेत्रात स्त्रिया कार्यरत आहेत त्यांना निर्भयपणे कार्य करता यावे यसाठी त्यांच्या कुटूंबातील सदस्यांनी व समाजातील लोकांनी त्यांना सर्वतोपरी सहकार्य करावे.

१३) पंचायतराज व्यवस्थेत महिला सदस्यांना प्रतिनिधीत्व देताना राजकीय घराणेशाही ऐवजी सर्वसामान्य जनतेतून योग्य व कार्यक्षम प्रतिनिधी निवडले जावेत.

वरीलप्रमाणे ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर महिलांचा सहभाग स्थानिक स्वराज्य संस्थांत मोठ्या प्रमाणात वाढत असून त्याचा प्रशासनावर चांगला परिणात घडत आहे. लोकशाही बळकटी प्राप्त होण्याचे दृष्टीने ७३ वी घटनादुरूस्ती मौलाचा दगड ठरणार हे नक्कीच.

**संदर्भ ग्रंथ सूची**

मराठी

१. विद्युत भागवत– स्त्री प्रश्नाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने – प्रतिमा प्रकाशन
२. कोंडेकर ए.वाय. – इतिहास आधुनिक भारत व चीन, नियती प्रकाशन, पुणे १९९५
३. कांबळे आर.आर. – 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान' विशेष संदर्भ कोल्हापूर जिल्हा अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
४. खडसे भा. कि. भारतीय सामाजिक समस्या हिमालय पब्लिकेशन हाऊस, मुंबई १९९५
५. डॉ. के.जी. पठाण संदर्भ – महाराष्ट्र राज्य जिल्हे एक दृष्टीकोन, खंड ५ वा डॉ. व्ही.एस.मग्नाळे इंटेलेक्टयूल बुक ब्यूरो, भोपाळ २००५
६. जयानंद मटकर, महाराष्ट्र शिल्पकार, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ
७. प्रा. सौ. माधवी कवी, महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर
८. ग.प्र.प्रधान, रा.ग.जाधव, निवडक साधना चळवळ व अंदोलने खंड ४, साधना प्रकाशन, पुणे २००७
९. ज.शं.आपटे पुष्पा रोडे, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे. ऑक्टोबर २००८.
१०. डॉ.प्रकाश पवार – सार्वजनिक धोरण सिध्दांत आणि भारतीय सार्वजनिक धोरणाचा आढावा, प्रतिमा प्रकाशन पुणे २० एप्रिल २०१०.
११. प्रा.व्ही.बी.पाटील महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था के. सागर पब्लिकेशन, पुणे – २००५
१२. डॉ. मुकूंद महाजन, पंचायतीसंबंधी ७३ वी घटनादुरूस्ती, पी.व्ही.मंडलिक ट्रस्ट,मुंबई मार्च १९९८
१३. पाटील लिला स्त्री जीवनाची चित्तवेध चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, २००२
१४. पाटील प्रकाश बेटीधनाची पेटी सकाळ, २६ सप्टेंबर २०११ नागपूर
१५. पानसरे गोविंद राजर्षि शाहू वसा आणि वारसा श्रमिक प्रतिष्ठाने कोल्हापूर
१६. साने गिता – भारतीय स्त्री जीवन, मुंबई मौज प्रकाशन गृह १९८६
१७. ठाकूर धोंडीराम सिंह महिलाबचत गटातून महिलांचे सबलीकरण लोकराजा जुलै २००५
१८. साळुंके आर.एस. भारतातील महिला साक्षरता आणि सबलीकरण योजना जून २००६
१९. सुतार विद्या महिला सर्वांगिण विकास प्रमुख आधार स्तंभ योजना जून २०१०
२०. शिंदे ताराबाई स्त्री पुरूष तुलना प्रतिमा प्रकाशन पुणे १९९७
२१. स्मरणीका, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर जिल्हा परिषद मार्च २०१२
२२. महाराष्ट्र गॅझेटियर (२००४) कोल्हापूर जिल्हा (रूपा.के.के.चौधरी) मुंबई गॅझेटियर ऑफ इंडिया
२३. भारताचे संविधान संचालक, मुद्रन लेखन, साम्रगी, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्यावतीने मुद्रीत प्रकाशीत १९७९
२४. अ.ना.कुलकर्णी भारतातील ठरावीक शासन विमा प्रकाशन, नागपूर फेब्रु २०००
२५. सुरेश काकडे अरविंद वझे 'पंचायत राज' प्राची प्रकाशन मुंबई जून १९८३
२६. आर.डी.साबळे महाराष्ट्रातील शासन आणि राजकारण अभय प्रकाशन, नांदेड प्रथम आवृती १९९९
२७. शाम सिरसाठ, भगवानसिंग बैनाडे भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था विद्या पब्लिशर्स औरंगाबाद जून २००६
२८. नारायण शर्मा प्राचीन भारतातील राजकीय संस्था डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथम आवृती २००६
२९. नलावडे पंडित शेषराव 'सभा विकेंद्रीकरण आणि ७३ वी संविधान दुरूस्ती' चिन्मय प्रकाशन औरंगाबाद ऑगस्ट २००८
३०. अग्रवाल प्रमोदकुमार 'भारत मे पंचायत राज' ज्ञानगंगा प्रकाशन दिल्ली २००६
३१. सुहास पळशीकर राजेंद्र व्होरा 'राज्यशास्त्राचे शब्दकोष' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे १९८७

English

1. Antony M. J. Women's Rights, Dialogue Publications New Delhi 1985
2. Chawla Monica 'Gender Justice' Deep & Deep Publication New Delhi 2006
3. Khan M.A. 'Women and Human Right' SBS Publishers New Delhi 2005
4. Reddy G. B. 'Women and the Law' gogia Law Agency Hyderabad 2006
5. Virg Gawande 'Women Emplowement and Development Training' Adhar Social Research Amarawati April 2012
6. Election Commission of India State Election 2004
7. Nagendra Shilaja 'Women's Right' ABD publishers Jaipur 2006